ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 5 | JANUARY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# "काश्मीर प्रश्न आणि आंतरराष्ट्रीय समुदायाचे इतिहासलेखनःविशेष संदर्भ प्रा. ख्रिस्तोफर स्नेडेन"



**श्री. भारत बापू बिचितकर**
सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग,
श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी.

**गोषवाराः**

**'काश्मीर प्रश्न' हा भारत आणी पाकिस्तान या दोन देशांतील काश्मीर प्रदेशाच्या अधिकारावरून सुरु असलेला प्रादेशिक वाद असून, तो स्वातंत्र्योत्तर भारताच्या इतिहासातमागील सात दशकांपासून अनिर्णीत अवस्थेत आहे. पहिल्या भारत-पाकिस्तान युध्दा दरम्यान भारताने हा प्रश्न संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेत उपस्थित केल्यामुळे दोन देशांतील या प्रश्नाचे आंतरराष्टीयकरण झाले. तेंव्हापासून मागील सात दशकांत आंतरराष्ट्रीय स्तरावर यावर साधक बाधक चर्चाहोत राहिली आहे. सहाजिकच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरअनेक पत्रकार, शिक्षणतज्ञ, अभ्यासक, संशोधक आणि इतिहासकार काश्मीर प्रश्नावर विपूल प्रमाणात विविधांगी चर्चा व लेखन करत आहेत.सुरुवातीच्या काळातील याबाबत झालेल्या इतिहासलेखनात काश्मीरचा प्रश्न हा भारत आणि पाकिस्तान या दोन देशांपूरताच मर्यादित आहे असा मतप्रवाह होता. परंतू अलिकडच्या काळातील कांही इतिहासकारांच्या इतिहासलेखनातील मतप्रवाह बदलताना दिसत आहेत.** ऑस्ट्रेलियातील ख्यातनाम अभ्यासक प्रा. ख्रिस्तोफर स्नेडेन यांनी त्यांच्या इतिहासलेखनातून आजवरच्या इतिहासलेखनापेक्षा वेगळे मत मांडले आहे. त्यांच्या मते काश्मीर समस्येत तीन शक्तींचा समावेश आहे. एक भारत, दुसरी पाकिस्तान आणि तिसरी म्हणजे काश्मीरी जनता. भारताच्या दृष्टीने अतिसंवेदनशील असलेल्या काश्मीरच्या समस्येवर जागतीक समुदायाच्या इतिहासलेखनाचा हा बदलता मतप्रवाह निश्चितच विचार करावयास लावणारा आणि भारताच्या दृष्टीने चिंतेचा आणि काश्मीरी जनतेच्या मनात संभ्रम निर्माण करणारा आहे.

## प्रस्तावनाः

स्वातंत्र्यप्राप्तीपासून काश्मीरचा प्रश्न हीभारताच्या दृष्टीने एक अतिसंवेदनशील राष्ट्रीय समस्या बनलीआहे हे नाकारता न येणारे वास्तव आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्यानुसार अखंड हिंदूस्तानची फाळणी होऊन त्यातून दि. 15 ऑगस्ट. 1947 पासून भारत आणि पाकिस्तान हे दोन स्वतंत्र देश अस्तित्वात आले. भारत आणि पाकिस्तानच्या स्वातंत्र्याबरोबरच काश्मीर प्रश्नाचाही उगम झाला. तेंव्हापासून आजपर्यंत हा प्रश्न सुटलेला नाही. दिर्घकाळ अनिर्णीत अवस्थेत राहिलेल्या काश्मीर प्रश्नाबद्दल राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक अभ्यासक चर्चा, करत असतात. एवढेच नव्हे तर यावर विपूल प्रमाणात संशोधन व इतिहासलेखनही झाले आहे. काश्मीर प्रश्नावर सुरुवातीला झालेल्या इतिहासलेखनात एकवाक्यता दिसत होती. परंतू जस-जसा काळ बदलत गेला तस-तसे याबाबतच्या इतिहासलेखनातील सुरही बदलत चालले आहेत. विशेषतः आंतरराष्ट्रीय समुदायाच्या अलिकडच्या काळातील याबाबतच्या इतिहासलेखनातील दृष्टिकोन कांहिसा बदललेला जाणवतो.याचे अगदी ताजे उदाहरण म्हणजे, ऑस्ट्रेलियाचे ख्यातनाम अभ्यासक प्रा. ख्रिस्तोफर स्नेडेन यांनी काश्मीरच्या समस्येवर लिहिलेला ‘काश्मीरः दि अनरिटन हिस्ट्री’ हा ग्रंथ होय. जागतीक पातळीवरच्या आघाडीच्या प्रकाशन संस्थांपैकी एक असलेल्या हार्पर कोलोन्स, इंडिया या प्रकाशन संस्थेने दि. 30 मे, 2013 रोजी हा ग्रंथ प्रकाशीत केला.

प्रा ख्रिस्तोफर स्नेडेन हे दक्षिण आशियाच्या प्रदेशातील राजकिय डावपेचांचे विश्लेषण करणारे ऑस्ट्रेलियाचे एक मुत्सद्दी विश्लेशक आहेत. शिवाय काश्मीर समस्येवर संशोधन करण्यासाठी त्यांनी वारंवार जम्मू आणि काश्मीरला प्रत्यक्ष भेटी देऊन, काश्मीर विवादामध्ये सहभाग असलेल्या अनेक वरिष्ठ राजकाणी व्यक्तींच्या मुलाखती घेऊन(1) काश्मीर समस्येचे विविधांगी राजकिय विश्लेषण केले आहे. त्यामुळे त्यांच्या काश्मीर समस्येवरील इतिहासलेखनाला गांभिर्याने घ्यावेच लागेल.काश्मीर समस्येबाबत त्यांचे हे इतिहासलेखनआजवर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेल्या इतिहासलेखनापेक्षा कांहीशा वेगळ्या दृष्टिकोणातून असल्याचे जाणवते. म्हणून ऑस्ट्रेलियन इतिहास संशोधक प्रा. ख्रिस्तोफर स्नेडेन यांचे काश्मीर समस्येबाबतचे इतिहासलेखन अभ्यासाचा व संशोधनाचा विषय बनले आहे. प्रा. ख्रिस्तोफर स्नेडेन यांच्या इतिहासलेखनातील वेगळ्या विचारप्रवाहाचा परामर्श घेणे हा प्रस्तूत शोधनिबंधाचा मुख्य उद्देश आहे.

## शोधनिबंधाचे उद्देशः

अ. काश्मीर समस्येबाबत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर झालेल्या इतिहासलेखनाचा आढावा घेणे.

आ. ऑस्ट्रेलियन इतिहास संशोधक प्रा. ख्रिस्तोफर स्नेडेन यांच्या काश्मीर समस्येबाबतच्या इतिहासलेखनाचा आढावा घेणे.

इ. ऑस्ट्रेलियन इतिहास संशोधक प्रा. ख्रिस्तोफर स्नेडेन यांच्या काश्मीर समस्येबाबच्या इतिहासलेखनातील वेगळ्या विचारप्रवाहाचा शोध घेणे.

## गृहितके:

अ. काश्मीर समस्येबाबत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर विपूल प्रमाणात इतिहासलेखन झालेले आहे.

आ. ऑस्ट्रेलियन इतिहास संशोधक प्रा. ख्रिस्तोफर स्नेडेन यांनी काश्मीर समस्येबाबत केलेले इतिहासलेखन एक दर्जेदार राजकिय विश्लेषण आहे.

इ. ऑस्ट्रेलियन इतिहास संशोधक प्रा. ख्रिस्तोफर स्नेडेन यांच्या काश्मीर समस्येबाबच्या इतिहासलेखनातील विचारप्रवाह आंतरराष्ट्रीय समुदायाच्या इतिहासलेखनापेक्षा वेगळा आहे.

## संशोधन पध्दती:

प्रस्तूत शोधनिबंधाच्या लेखनासाठी प्रामुख्याने दुय्यम संदर्भ साधनांचा वापर करण्यात आला आहे.काश्मीर समस्येच्या निर्मीतीपासून याबाबत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध पत्रकार, अभ्यासक व संशोधक यांनी केलेल्या निवडक लेखनाचा अभ्यास करून, त्यापैकीऑस्ट्रेलियन इतिहास संशोधकप्रा. ख्रिस्तोफर स्नेडेन यांच्या इतिहासलेखनातील वेगळ्या विचारप्रवाहाचा आढावा प्रस्तूत शोधनिबंधात करण्यात आला आहे.

## काश्मीर समस्या आणि पाकिस्तानचे अंतर्गत राजकारण:

पाकिस्तानच्या अंतर्गत राजकारणातसुरुवातीपासूनचकाश्मीर समस्येला विशेष महत्व दिले जाते. काश्मीर समस्येबाबत खरे-खोटे कांहीही असो, पण पाकिस्तानच्या अंतर्गत राजकारणात तेथील सर्वच राजकिय पक्षांना काश्मीर प्रश्नावरून भारतविरोधी आक्रमक भूमिका घ्यावीच लागते. पाकिस्तानातील कोणताही राजकिय पक्ष, ‘काश्मीरचा प्रश्न पाकिस्तानने भारताशी चर्चा करुन सोडवावा’ अशी भूमिका कमीतकमी जाहीरपणे तरी घेऊ शकत नाही. पाकिस्तानातील कोणताही राजकिय पक्ष याला अपवाद नाही. मागील कांही वर्षांपूर्वी म्हणजे 2007 मध्येपाकिस्तान पीपल्स पार्टी चे तरुण नेते बिलावल भुत्तो यांचा राजकारणातील प्रवेश जाहीर करण्यासाठी कराची शहरात एका विराट जाहिर सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी बोलताना बिलावल भुत्तो यांनी, ‘जोपर्यंत काश्मीरचा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत भारताशी कोणत्याही प्रकारची चर्चा करु नये’ अशी काश्मीर प्रश्नाबाबतची आपली भूमिका राजकारणातील प्रवेशावेळीच जाहीर केली(2). एवढेच नव्हे तर सन 2014 मध्ये बिलावल यांनी सिंध प्रांत असेंब्लीमध्येनॅशनल युथ पार्लमेंटच्या सेशनसमोर बोलताना काश्मीर प्रश्नावरुन थेट संयुक्त राष्ट्र संघटनेला लक्ष करुन, संयुक्त राष्ट्र संघटना काश्मीर प्रश्न सोडविण्यात कुचकाकामी ठरल्याची मुक्तफळे उधळली(3).

वरिल दोन्ही उदाहरणांवरून असे दिसते की, आपल्या राजकिय पूर्वजांनी अथवा पक्षाने यापूर्वी कोणते धोरण स्विकारले आहे याचा विधिनिषेध न बाळगता पाकिस्तानमधिल सर्वच राजकिय नेते, मग ती पिढी नवी असो वा जूनी, काश्मीर प्रश्नावर भारतविरोधी आक्रमक भूमिका घेताना दिसतात.

**खरे पाहिले तर डिसेंबर, 1971 मध्ये बांगलादेशाची निर्मिती झाल्यानंतर दि. 2 जुलै**, 1972 रोजी भारत व पाकिस्तान यांच्यात ‘सिमला करार’ झाला होता. शिमला करारानुसार, ‘काश्मीरचा प्रश्न भारत आणि पाकिस्तान या उभय देशांनी एकमेकांशी चर्चा करुन सोड्वावा’[4] असे ठरले आहे. **पाकिस्तान पीपल्स पार्टी चे**तत्कालीन नेते आणि बिलावल भूत्तो चे आजोबा झुल्फिकार अलि भुत्तो यांनी शिमला करारावर पाकिस्तानच्या वतीने स्वाक्षरी केली, याकडे पध्दतशीर कानाडोळा करुन **काश्मीर प्रश्नावरुन थेट संयुक्त राष्ट्र संघटनेला लक्ष केले आणि काश्मीर प्रश्न सोडविण्यात कुचकाकामी ठरल्याचा आरोप संयुक्त राष्ट्र संघटनेवर केला. थोडक्यात म्हणजे पाकिस्तानच्या राजकारणातील सत्ताधारी पक्ष असो किंवा विरोधी पक्ष असो यांच्यात अनेक मुद्द्यावरुन टोकाचे मतभेद असले तरी ‘काश्मीर प्रश्नावरुन भारत द्वेश’ हा एकमेव मुद्दा असा आहे ज्यावर सर्व राजकिय पक्षांचे एकमत असते हे पाकिस्तानच्या अंतर्गत राजकारणाचे वास्तव आहे.**

## काश्मीर प्रश्नावरुन पाकिस्तानमधील राजकिय अंतर्विरोधः

**पाकिस्तानातील सर्वच राजकिय पक्ष काश्मीर प्रश्नावरुन भारत द्वेश व्यक्त करुन याबाबत आंतरराष्ट्रीय समुदायाला वारंवार दोष देत असले तरी, काश्मीर प्रश्नावरुन पाकिस्तानातील राजकिय अंतर्विरोध आता उघड होऊ लागले आहेत. मागील कांही वर्षांपासून जे बिलावल भूत्तो काश्मीरच्या प्रश्नावरुन आंतरराष्ट्रीय पातळीवर रान उठवत आहेत, त्यांच्याच राजकिय पक्षाचे तत्कालीन नेते आणि त्यांचेच आजोबा झुल्फिकार भूत्तो यांनी, ‘काश्मीरचा प्रश्न उभय देशांनी चर्चा करुन सोडवावा’ अशा आशयाच्या शिमला करारावर स्वाक्षरी केली होती. एवढेच नव्हे तर ज्या नवाझ शरीफांनी पाकिस्तानचे पंतप्रधान असताना काश्मीरचा प्रश्न संयुक्त राष्ट्र संघटनेत उपस्थित केला होता, त्याच नवाझ शरीफांनी सन 1999 मध्ये भारताचे तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्याशी बोलताना, ‘काश्मीर प्रश्नाबाबत शिमला करार महत्वाचा आहे’ असे विधान करुन काश्मीरचा प्रश्न उभय देशांनाच आपसात सोडवावा लागणार आहे हे अधोरेखित केले होते. याचाच अर्थ असा की काश्मीर प्रश्नाबाबत वस्तूस्थिती कांहीही असली तरी पाकिस्तानातील सर्वच राजकिय पक्षांना याबाबत भारतालाच दोष दिल्याशिवाय त्यांना अंतर्गत राजकारणात पर्याय राहत नाही ही वस्तीस्थिती अलिकडच्या काळात पुढे येऊ लागली आहे. पाकिस्तानच्या राजकारणातील या वस्तूस्थितीचे भान ठेवूनच आजवरच्या इतिहासलेखकांनी काश्मीर प्रश्नावर इतिहासलेखन केलेले आढळते.**

## सार्वमतः काश्मीर समस्येचा विळखाः

**काश्मीर प्रश्न आज सार्वमताच्या विळख्यात अडकला आहे. भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी पहिल्या भारत-पाकिस्तान युध्दादरम्यान दि. 1 जानेवारी, 1948 रोजी काश्मीरचा प्रश्न संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेत उपस्थित केला[5]. त्यातून काश्मीरचा प्रश्न सार्वमताच्या आधारावर सोडवावा हा मुद्दा पुढे आला[6]याचा तपशीलवार इतिहास वेगळा आहे.परंतू ,**

तेंव्हापासून सार्वमत हा काश्मीर समस्या सोडविण्यात कळीचा मुद्दा बनला आहे. सार्वमत घेण्यास भारताचा आक्षेप नाही. परंतू भारताचे सार्वमताचे आश्वासन हे पाकव्याप्त काश्मीरमधून पाकिस्तानने सैन्य मागे घेतल्यानंतर संपूर्ण जम्मू आणि काश्मीरमध्ये सार्वमत घेण्याचे आहे, केवळ भारताच्या ताब्यात असलेल्या जम्मू आणि काश्मीरमध्ये नाही. याचा व्यवहारीक अर्थ, जोपर्यंत पाकव्याप्त काश्मीरमधून पाकिस्तान सैन्य मागे घेत नाही, तोपर्यंत भारत जम्मू आणि काश्मीरमध्ये सार्वमत घेण्यास बांधील नाही असा होतो. अशी वस्तूस्थिती नजरेसमोर ठेऊनच आजवरच्या आंतरराष्ट्रीय समुदायाचे इतिहालेखन झालेले आढळते. परंतू अलिकडच्या काळात प्रा. ख्रिस्तोफर स्नेडेनसारख्या कांही अपवादात्मक इतिहासकारांनी काश्मीर समस्येतील सार्वमताच्या मुद्याबाबत वस्तूस्थितीचा विपर्यास्त करणारे केलेले इतिहासलेखन चिंतेचा विषय बनले आहे.

## प्रा. ख्रिस्तोफर स्नेडेन यांचे काश्मीर समस्येबाबतचे इतिहासलेखनः

प्रा. ख्रिस्तोफर स्नेडेन यांनीअगदी अलिकडच्या काळातलिहिलेल्या आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या प्रकाशन संस्थेने प्रकाशीत केलेल्या 'काश्मीरः दि अनरिटन हिस्ट्री' या ग्रंथात काश्मीरच्या समस्येबाबत वेगळाच मुद्दा अधोरेखीत करुन आंतरराष्ट्रीय समुदायाच्या आणि काश्मीरमधील जनतेच्या मनात संभ्रम निर्माण केला आहे. यात त्यांचे मत आहे की, 'आजपर्यंत या समस्येत भारत व पाकिस्तान हे दोनच पक्ष आहेत असे समजले जात असे. पण यात कोणीही काश्मीरी जनतेला काय हवे होते व काय हवे आहे याची चर्चा करत नाही'. तसेच प्रा. स्नेडेन यांच्या संशोधनानुसार पूंछ व मीरपूर भागातील जनतेच्या मनात सुरुवातीपासूनच काश्मीरचा राजा हरिसींग यांच्या राजवटीबद्दल असंतोष दाटलेला होता. काश्मीरमधील बहुसंख्य जनतेला आपण स्वतंत्र रहावे असेच वाटत होते. पण भारत आणि पाकिस्तानच्या वादात तेथील जनतेचा आवाज दाबला गेला. विशेष म्हणजे भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशात एका बाबतीत एकवाक्यता आहे आणि ती म्हणजे, काश्मीर एक तर भारताकडे राहील किंवा पाकिस्तानात जाईल. मात्र दोन्हीही देशांना काश्मीरचे स्वतंत्र अस्तित्व मान्य नाही.

यापुढे प्रा. स्नेडेन असेही दाखविण्याचा प्रयत्न करतात की, सप्टेबर, 1947 मध्ये पश्तून (पठाणी) मुस्लिम घुसखोरांचे काश्मीरवर आक्रमण सुरु होण्याअगोदरच काश्मीरमधील मीरपूर व पूंछ भागातील जनतेने राजा हरिसिंग यांच्याविरुध्द उठाव सुरु केले होते. म्हणून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काश्मीरमध्ये घुसखोरी केलेल्या पाकिस्तानी घुसखोरांना तेथील जनतेने मदत केली(7).म्हणजेच प्रा. स्नेडेन यांच्या म्हणण्याचा अर्थ असा की, काश्मीर समस्येत तीन शक्तींचा अंतर्भाव आहे. एक म्हणजे भारत, दुसरी म्हणजे पाकिस्तान आणि तिसरी म्हणजे काश्मीरी जनता. अशा तिन्ही शक्तींना एकत्र घेऊन काश्मीर प्रश्न सोडवावा लागेल.

## भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्याने संस्थानिकांना पर्यायः

**काश्मीर प्रश्न सोडविण्यासाठी प्रा. ख्रिस्तोफर स्नेडेन यांनी आपल्या लेखनातून प्रतिपादीत केलेला काश्मीरी जनतेच्या मताचा भारत आणि पाकिस्तानने विचार करावा हा मुद्दा हा मागील सात दशकांपासून प्रलंबीत असलेल्या काश्मीरमध्ये सार्वमत घेण्याच्या बाबीशी निगडीत आहे. प्रा. स्नेडेन यांचे प्रतिपादन काश्मीर जनतेच्या मनात संभ्रम निर्माण करणारे आणि भारताच्या दृष्टीने अतिसंवेदनशील असलेल्या काश्मीर प्रश्नाकडे गांभिर्याने पाहत असलेल्या आंतरराष्ट्रीय समुदायाच्या भूमिकेत बदल करावयास लावणारे असल्यामुळे, ते निश्चितच गांभिर्याने घ्यावे लागते. मात्र याकडे चिकित्सकपणे पाहिले तर असे वाटते की, असे मत धाडसाने मांडण्यापूर्वी या अभ्यासकाने भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्यानुसार ब्रिटिश सरकारने संस्थानिकांना दिलेले पर्याय, संस्थानिकांचे अधिकारआणि संस्थानांच्या विलिनिकरणाबाबत भारताने अंगिकारलेले धोरण याचा गांभिर्याने विचार करावयास हवा होता.**

**कारण ब्रिटिश संसदेने दि. 18 जुलै, 1947 रोजी भारतीय स्वातंत्र्याचा कायदा संमत करून, त्यानुसार त्यांच्या अंमलाखाली असलेल्या ब्रिटिश भारताची फाळणी केली. त्यातूनदि. 15 ऑगस्ट, 1947 पासून भारत आणि पाकिस्तान हे दोन स्वतंत्र देश निर्माण झाले. तसेच देशातील सुमारे 552 संस्थानांसाठी या कायद्यात स्वतंत्र तरतूद करुन त्यांना, त्यांनी भारतात विलिन व्हावे किंवा पाकिस्तानात विलिन व्हावे किंवा स्वतंत्र रहावे असे तीन पर्याय दिले, हि या प्रश्नाची एक बाजू होती. तर या प्रश्नाची दुसरी बाजू म्हणजे** संस्थानांच्या विलिनिकरणाबाबत काँग्रेसचे धोरण कांहिसे वेगळे होते. जेथे राजा व प्रजा यांचा धर्म एकच होता तेथे प्रश्न नव्हता. मात्र जेथे राजा व प्रजा यांचे धर्म वेगळे होते तेथे जनतेचे मत विचारात घ्यावे असे काँग्रेसचे धोरण होते.**परंतू, सरदार वल्लभभाई पटेलांसारख्या खमक्या नेत्याने स्वातंत्र्यापूर्वीचअवघ्या 40 दिवसांत अनेक संस्थानिकांशी चर्चा करुन त्यांचे विलिनिकरण पूर्ण करुन तशा प्रकारचे भारत सरकार्शी नवे करारही केले. अन्यथा स्वातंत्र्याच्या दिवशी आपणास भारत व पाकिस्तान आणि 552 स्वतंत्र संस्थानीक असे एकूण 554 देश दिसले असते.**

**याचाच अर्थ असा की, भारताच्या स्वातंत्र्यावेळी दि. 15 ऑगस्ट, 1947 रोजी ब्रिटिश भारतातील बहुतेक संस्थाने भारतीय संघराज्यात विलिन झाली होती. अपवाद होता तो फक्त हैदराबाद, जुनागढ आणि जम्मू-काश्मीरचा.त्यापैकी सरदार पटेलांनी हैदराबादमध्ये लष्करी कारवाई केली. जुनागढमध्ये** काँग्रेसने सार्वमत घेतले. तर जम्मू आणि काश्मीरचा राजा हरिसिंग यानी भारत व पाकिस्तान यांच्याशी 'जैसे थे' करार करुन स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला होता. मात्र सुदैवाने म्हणा किंवा दुर्दैवाने म्हणा पाकिस्तानला जम्मू काश्मीर गिळंकृत करण्याची घाई झाली होती. म्हणून त्यांनी जम्मू काश्मीरच्या प्रदेशात घुसखोर घुसविले. हे घुसखोर दुसरे तिसरे कोणीही नसून साध्या वेशातील पाकिस्तानी लष्करच होते, हे वास्तव जगाला माहित आहे. पाकिस्तानच्या व्यवसायीक लष्करापूढे राजा हरिसिंगाचा टिकाव लागणे शक्यच नव्हते. बघता-बघता पाकिस्तानी घुसखोर

श्रीनगरच्या सीमेपर्यंत पोहोचले. तेंव्हा काश्मीरचे राजे हरिसिंग यांनी घाईघाईने दि. 26 आक्टोबर, 1947 रोजी भारत सरकारशी विलिनीकरणाचा करार केला. राजा हरिसिंगानी भारत सरकारशी केलेला विलिनीकरणाचा करार हा कायदेशीर दस्तऐवज आहे[8]. भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्यानुसार संस्थानांच्या विलिनीकरणाचा निर्णय घेण्याचा अधिकार त्या-त्या संस्थानांच्या संस्थानिकांचा होता. सार्वमत घेण्याचे धोरण सत्तारुढ काँग्रेस या राजकिय पक्षाचे होते. कायद्याने ते संस्थानिकांवर बंधनकारक म्हणून लादता येणार नव्हते. त्यामुळेप्रा. ख्रिस्तोफर स्नेडेन यांच्या इतिहासलेखनात काश्मीरी जनतेच्या मताला म्हणजेच पर्यायाने सार्वमताला देण्यात आलेले अवास्तव महत्व वस्तूस्थितीचा विपर्यास्त करणारे असल्याचे जाणवतो.

## उपसंहारः

प्रा. ख्रिस्तोफर स्नेडेन यांच्या इतिहासलेखनातून अधोरेखीत करण्यात आलेला काश्मीरी जनतेचे मत म्हणजेच सार्वमत हा मुद्दा जम्मू काश्मीर संस्थानाचे राजे हरिरिंग यांनी या संस्थानाचे भारतात कायदेशीरदृष्ट्या केलेल्या विलिनिकरणानंतर आंतरराष्ट्रीय समुदायाच्या चर्चेतून पुढे आला आहे.शिवाय त्याबाबत भारताची भूमिका पारदर्शी अशीच आहे. मात्र प्रा. ख्रिस्तोफर स्नेडेन यांच्या इतिहासलेखनात याकडेडोळेझाक करण्यात आल्याचे दिसून येते. विलिनीकरणाच्या कायदेशीर दस्तऐवजाच्या आधारे जम्मू आणि काश्मीर भारताचा अविभाज्य भाग बनल्यामुळे या प्रदेशातील पाकिस्तानी व्यावसायीक लष्कराची घुसखोरी रोखण्यासाठी भारताने श्रीनगरच्या दिशेने लष्कर रवाना केले.त्यातून भारत आणि पाकिस्तान यांच्यात पहिले युध्द सुरु झाले. पहिल्या भारत-पाक युध्दादरम्यान भारताकडून काश्मीरचा प्रश्न संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेत मांडण्यात आला. सुरक्षा परिषदेने दि. 21 एप्रिल, 1948 रोजी ठराव क्र. 47 संमत केला. त्यानुसार काश्मीरी जनतेचे मत जाणून घेण्याचा म्हणजेच सार्वमताचा मुद्दा पुढे आला.मात्र सुरक्षा परिषदेचावरिल ठराव तीन भागांचा आहे. पहिल्या भागात पाकिस्तानने पाकव्याप्त काश्मीरमधून घुसखोर लष्कर मागे घ्यावे, त्यानंतर त्या भागात भारताने कायदा सुव्यवस्था निर्माण करुन मुक्त राजकिय वातावरण निर्माण करावे असे दुसरा भाग सांगतो, आणि त्यानंतर भारताने जम्मू-काश्मीरच्या संपूर्ण प्रदेशात सार्वमत घ्यावे असे या ठरावाचा तिसरा भाग सांगतो. म्हणजेच पाकिस्तानने पाकव्याप्त काश्मीरमधून लष्कर मागे घेतल्यानंतर भारत दिलेल्या आश्वासनानुसार संपूर्ण जम्मू-काश्मीरमध्ये सार्वमत घेण्यास बांधील आहे, फक्त भारताच्या ताब्यात असलेल्या जम्मू-काश्मीरमध्ये नव्हे. मागील सुमारे सत्तर वर्षांपासून पाकिस्तान पाकव्याप्त काश्मीरमधून लष्कर मागे घेण्यास तयार नाही. म्हणून भारत जम्मू-काश्मीरमध्ये सार्वमत घेत नाही हे खरे वास्तव आहे. मात्र प्रो. ख्रिस्तोफर स्नेडेन यांनी आपल्या इतिहासलेखनात या वस्तूस्थितीकडे दुर्लक्ष करुन काश्मीर समस्येत काश्मीरी जनता ही तिसरी शक्ती असल्याचे नोंदविलेले निष्कर्ष विपर्यस्त वाटतात.

## संदर्भसूचीः


१. https://harpercollins.co.in/book/kashmir-the-untold-story.

२. “Reimagining Kashmir”, The Hindu, New Delhi, 1 March, 2013.

३. ‘काश्मीर प्रश्न सोडवण्यास संयुक्त राष्ट्र कुचकामी, बिलावलची मुक्ताफळे, दिव्य मराठी, दि. 14 आक्टोबर, 2014.

४. “Simla Agreement”, Bilateral/Multilateral Documents, Ministry of External Affairs, Government of India, Retrieved 27 September, 2013.

५. Korbel, Josef, The Kashmir Dispute After Six Years, 1953, Cambridge University Press, Page 499.

६. Raghvan, Sainath, War and Peace in Modern India, Palgrave Macmillan, New York, US, 2010, Page 137

७. “Reimagining Kashmir”, The Hindu, New Delhi, 1 March, 2013.

८. Anand, A. S. (Justic), The Constitution of Jammu and Kashmir (5th edition, 2006), page 67.